आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१४ नोव्हेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या शनिवारपासून नायजेरिया, ब्राझील आणि गयानाच्या सहा दिवसांच्या दौऱ्यावर
- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची आज मुंबईत सभा
- केंद्र सरकार आदिवासी समुदायाला संसाधनापासून दूर ठेवत असल्याचा राहुल गांधी यांचा नंदुरबारच्या प्रचारसभेत आरोप
- झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात काल ६६ पूर्णांक ५१ शतांश टक्के मतदान

**आणि**

- देशाचे पहिले प्रधानमंत्री दिवंगत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त देशाची आदरांजली

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या शनिवारपासून नायजेरिया, ब्राझील आणि गयानाच्या सहा दिवसांच्या दौऱ्यावर जाणार असल्याची माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी काल नवी दिल्लीत माध्यमांना दिली. १९व्या जी-वीस शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी मोदी १८ आणि १९ नोव्हेंबरला ब्राझीलला भेट देणार असून त्यांचा हा तिसरा अधिकृत ब्राझील दौरा आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना डॉमिनिका देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर झाला आहे. कोविड महामारीच्या काळातल्या कामगिरीच्या गौरवार्थ, आणि दोन्ही देशांतली भागीदारी मजबूत करण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांबद्दल हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. गयाना इथं होणाऱ्या इंडिया CARICOM या परिषदेत हा सन्मान प्रदान करण्यात येईल.

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचे आता शेवटचे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे राजकीय नेत्यांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज छत्रपती संभाजीनगर, पनवेलजवळ खारघर आणि मुंबईत शिवाजी पार्कवर सभा घेणार आहेत. केंद्रीय मंत्री नितिन गडकरी आज धाराशिव, सोलापूर आणि सांगली इथे प्रचारसभा घेणार आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांची सभा नंदुरबार इथं झाली. नंतर ते नांदेड इथे प्रचारसभा घेणार आहेत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आज इगतपुरी आणि पुणे इथे प्रचारसभा घेत आहेत.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या धोरणनिर्मितीत आदिवासी अधिकाऱ्यांना मर्यादित अधिकार असून आदिवासी समुदायाला संसाधनापासून दूर ठेवलं जातं, असा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी केला. ते आज नंदुरबार इथं प्रचारसभेत बोलत होते. देशात आदिवासींची लोकसंख्या ८ टक्के आहे, मात्र त्यांना सोयी सुविधा नाकारल्या जातात. ही परिस्थिती बदलायची असेल तर जातनिहाय जनगणना करावी लागेल, असं गांधी म्हणाले. प्रत्येक समुदायाच्या संख्येनुसार त्यांची

भागीदारी सुनिश्चित केली जाईल, आरक्षणाची ५० टक्क्याची मर्यादा काढून टाकली जाईल, शेतकऱ्यांचं तीन लाखापर्यंतचं कर्ज माफ केलं जाईल, महालक्ष्मी योजने अंतर्गत महिलांना दरमहा तीन हजार रुपये दिले जातील, २५ लाखापर्यंतचा आरोग्य विमा दिला जाईल, अडीच लाख सरकारी नोकऱ्या दिल्या जातील, अशी आश्वासनं राहुल गांधी यांनी दिली.

राहुल गांधी प्रत्येक सभेत संविधानाची प्रत दाखवतात यावरून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या टीकेला गांधी यांनी या सभेत प्रत्युत्तर दिलं.

**होल्ड--बाईट--(राहुल गांधी)**

महायुतीच्या काळात राज्यातले उद्योग प्रकल्प दुसऱ्या राज्यात नेण्यात आले असून ५ लाख रोजगार हिसकावले गेल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला. राज्यातल्या जनतेला रोजगार मिळावा, अधिकारांचं संरक्षण व्हावं, यासाठी महाविकास आघाडी काम करेल असं ते म्हणाले.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज सोलापूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला मतदारांनी आपला हक्क बजावत मतदान करण्याचं आवाहन अभिनेत्री सीमा देशमुख यांनी केलं आहे......

**होल्ड--बाईट--(अभिनेत्री सीमा देशमुख) २७ सेकंद**

**<><><><><>**

झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात १५ जिल्ह्यांतल्या ४३ मतदारसंघांमध्ये काल ६६ पूर्णांक ५१ शतांश टक्के मतदान झालं. सर्वाधिक म्हणजे ७९ टक्क्यांपेक्षा जास्त मतदान खरसावन इथं नोंदवलं गेलं. काल ६८३ उमेदवारांचं राजकीय भवितव्य मतपेटीत बंद झालं. सरायकेलामधून भाजपचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन, रांचीमधून राज्यसभा खासदार आणि झामुमोचे उमेदवार महुआ माजी, लोहरदगामधून काँग्रेसचे रामेश्वर ओराव, जमशेदपूर (पश्चिम) मधून जनता दल (युनायटेड)चे सरयू राय तसंच, इचागढ मधून AJSU चे हरे लाल महतो अशा महत्त्वाच्या उमेदवारांचं भवितव्य या निवडणुकीत ठरणार आहे. २० नोव्हेंबर रोजी दुसऱ्या टप्प्यातलं मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

**<><><><><>**

१० राज्यांतल्या ३१ विधानसभा मतदारसंघ आणि केरळातल्या वायनाड लोकसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठीही काल मतदान झालं. यामध्ये राजस्थानातले सात, पश्चिम बंगालमधले सहा, आसाममधले पाच, बिहारमधले चार, कर्नाटकातले तीन आणि मध्य प्रदेशातल्या दोन जागांचा समावेश आहे. याशिवाय

केरळ, छत्तीसगड, गुजरात आणि मेघालयमध्ये विधानसभेच्या प्रत्येकी एका जागेसाठी काल मतदान झालं. केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघासाठी झालेल्या पोटनिवडणुकीत सुमारे ६५ टक्के मतदान झालं.

<><><><>

देशाचे पहिले प्रधानमंत्री दिवंगत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त देश आदरांजली वाहत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नेहरु यांना आदरांजली वाहणारा संदेश समाजमाध्यमावर प्रसिद्ध केला आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मुंबईत राजभवन इथं पंडित नेहरुंच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं. राजभवनातल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी देखील पंडित नेहरु यांना आदरांजली वाहिली आहे.

<><><><>

श्रीलंकेत सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज मतदान सुरू आहे. सकाळी दहा वाजेपर्यंत २८ टक्के मतदान झालं होतं. अध्यक्ष अनुरा कुमार दिसानायके, प्रधानमंत्री डॉक्टर हरिनी अमरसूर्या, माजी अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे, साजित प्रेमदासा यांनी मतदानाचा हक्क बजावला.

<><><><>

माजी खासदार प्रज्ञा सिंह ठाकुर यांना मुंबई NIE च्या विशेष न्यायालयाने वारंट जारी केलं आहे. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातल्या अंतिम सुनावणीला प्रज्ञा

ठाकुर गैरहजर राहिल्या, त्यामुळे हे वारंट जारी करण्यात आलं आहे. प्रज्ञा सिंह यांना जारी केलेलं गेल्या आठ दिवसातलं हे दुसरं वारंट आहे.

**<><><><><>**

अमेरिकन संसद म्हणजेच काँग्रेसच्या अध्यक्षपदी माईक जॉन्सन यांची रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार म्हणून निवड करण्यात आली आहे. रिपब्लिकन पक्षाच्या बैठकीत नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या नावाला पाठिंबा दिला आहे. माईक जॉन्सन यांना पुढच्या वर्षी जानेवारी महिन्यात होणाऱ्या ४३५ सदस्यांच्या सभागृहात बहुमत मिळवावं लागेल. त्यानंतर त्यांची अध्यक्षपदी नियुक्ती होईल.

**<><><><><>**

एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेने लष्कर-ए-तैयबा या दहशतवादी संघटनेशी संबंधित एका आरोपीच्या स्थावर मालमत्तेवर टांच आणली आहे. गेल्या फेब्रुवारीत श्रीनगर इथं दोन पर्यटकांची हत्या झाल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. या आरोपीची श्रीनगरमधली मालमत्ता जप्त करण्यात आली असून तो सध्या श्रीनगरच्या मध्यवर्ती कारागृहात आहे.

**<><><><><>**

प्रशांत महासागराच्या दक्षिण भागात असलेल्या सोलोमन बेटांवर शास्त्रज्ञांना एका महाकाय प्रवाळ खडकाचा शोध लागला आहे. या प्रवाळाचा आकार फुटबॉलच्या दोन मैदानांएवढा असून तो अंतराळातूनही दिसतो. हा प्रवाळ पॅवोना क्लाउस या प्रजातीशी संबंधित असून तो ३०० वर्षांहून जास्त जुना असण्याची

शक्यता शास्त्रज्ञांनी वर्तवली आहे. हवामान बदलाच्या प्रशांत महासागरावर होणाऱ्या परिणामावर संशोधन करणाऱ्या एका व्हिडीओग्राफरला हा प्रवाळ सर्वप्रथम दिसला होता. विशेष म्हणजे गेला काही काळ सातत्याने होणाऱ्या हवामान बदलाचा प्रवाळांवर गंभीर परिणाम होत असताना या प्रवाळाचा आकार कमी झालेला नाही. त्यामुळे इतक्या मोठ्या प्रवाळाचा शोध हा महत्त्वपूर्ण असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.

**<><><><><>**

बिहारमध्ये सुरू असलेल्या महिला आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत आज यजमान भारताचा सामना थायलंडच्या संघाशी होणार आहे. राजगीर इथे संध्याकाळी पावणे पाच वाजता हा सामना सुरू होईल. यापूर्वीच्या दोन सामन्यां भारताच्या संघाने मलेशिया आणि दक्षिण कोरियाचा पराभव केला होता. या स्पर्धेत आज दुपारी अडीच वाजता जपानचा सामना चीनसोबत होणार आहे.